**<u>नियमीत दिवाणी दावा क्र.१/२०१८, नि.क्र.२५ वरील आदेश</u>**

( सुप्रिया विभुते वगैरे वि. कविश विभुते वगैरे )

[ CNR No.MHSO12-000018-2018 ]

१) प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता, आदेश ६ नियम १७ प्रमाणे दाव्यात दुरुस्ती करण्यास परवानगी मिळावी यासाठी दाखल केला आहे.

२) वादी यांच्या म्हणण्याप्रमाणे दावा प्रलंबित असताना यातील प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी दावा कलम १ब मधील मिळकत प्रतिवादी क्र.७ याचे नावे बेकायदेशीररित्या हस्तांतर केली आहे. त्या अनुषंगाने वादी यांना दाव्यामध्ये दुरुस्ती करुन घेण्याचे आहे.

३) प्रतिवादी क्र.१, ३ व ४ यांनी मुळ दाव्यास कैफीयत दिली नसल्याने त्यांचे विरुध्द दिनांक ०६/०२/२०१९ रोजी विना कैफीयत आदेश पारीत करण्यात आलेला आहे. त्यानंतर सदर आदेश रद्द करुन त्यांनी कैफीयत दिलेली नाही. परंतु त्यांनी प्रस्तुत अर्जास म्हणणे देऊन तीव्र आक्षेप घेतलेला आहे. अन्य प्रतिवादींविरुध्द दावा एकतर्फा चालविण्यात आलेला आहे. प्रतिवादी क्र.१, ३ व ४ यांच्या म्हणण्याप्रमाणे वादी जाणूनबुजून दावा प्रलंबित ठेवण्यासाठी व प्रतिवादींना त्रास देण्यासाठी सदरचा खोटा अर्ज दाखल केला आहे. सदर अर्ज मंजूर झाल्यास दाव्याच्या मुळ स्वरुपात बदल होणार आहे. त्यामुळे अर्ज नामंजूर करणेची विनंती केली आहे.

४) अर्ज व त्यावरील म्हणणे तसेच अभिलेखात दाखल कागदपत्र यांचे काळजीपूर्वक अवलोकन केले.

५) सदर दावा हा जाहीर ठराव होऊन मिळणेसाठी व सरसनिरस मानाने वाटप होऊन पृथक कब्जा मिळणेसाठी दिनांक २२/१२/२०१७ रोजी दाखल केलेला आहे. वादींनी सुचविलेल्या दुरुस्तीमध्ये प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी दावा कलम १ब मधील मिळकत प्रतिवादी क्र.७ याच्या नांवे दिनांक २१/१२/२०१८ रोजी रजिस्टर दस्ताने

हस्तांतर केलेली आहे. सदर व्यवहार प्रतिवादी यांनी नाकारलेले नाही. अशा परिस्थितीत दावा प्रलंबित असताना दावा मिळकतीच्या बाबतीत झालेल्या सर्व घडामोडी व व्यवहार न्यायालयासमोर येणे गरजेचे आहे. वादी यांनी सुचवलेली दुरुस्ती मंजूर केल्यास मुळ दाव्याच्या स्वरुपात कोणताही बदल होणार नाही, तसेच प्रतिवादींचे ही काही नुकसान होणार नाही. या उलट प्रतिवादी यांना दुरुस्त कैफीयत देण्याची मुभा राहणार आहे. अर्ज नामंजूर झाल्यास पुढील गुंतागुंत वाढणार असून नवीन दाव्याची उत्पत्ती होणार आहे. अशा परिस्थितीत, दाव्याचा गुणदोषावर निर्णय करण्यासाठी प्रस्तुत अर्ज मंजूर करणे योग्य व न्यायोचित ठरणार आहे. सबब वरील बाबींचा विचार करता, पुढीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आ दे श

१. प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. वादी यांनी अर्जात मागणी केल्याप्रमाणे विहीत मुदतीत दुरुस्ती करण्याचे आहे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by Sampurna Kallappa Karande
Date: 2021.03.23 15:36:03 +0530

दिनांक – २३/०३/२०२१

( **संपुर्णा क. कारंडे** )
सह दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर,
बार्शी.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order are same word to word as per the original Judgment/Order.

| | | | |
|---|---|---|---|
| a) | Name of the Stenographer | : | R.P. Sakinal, Steno. Grade-2 |
| b) | Court | : | Jt. Civil Judge Sr. Div. and Addl. C.J.M., Barshi. |
| c) | Date of Judgment/Order | : | 23.03.2021 |
| d) | Judgment/Order signed by the Presiding Officer on | : | 23.03.2021 |
| e) | Judgment/Order uploaded on | : | 23.03.2021 |